महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २५१७२१६९/७०
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 25172169 / 70
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक-कशिमं-२०२६/वार्षिक/ सहा/ 1291

दिनांकः- 20 JUL 2026

# परिपत्रक

विषय : <u>शासकीय उच्चकला सत्र परीक्षा (शैक्षणिक वर्ष-२०२५-२६)</u>
निकाल जाहीर करण्याबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये आयोजित करण्यात खालील कला पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचा व्दितीय सत्र (Second Semester) परीक्षेचा निकाल उच्चकला परीक्षेच्या **https://hae.semesterpattern.msbae.in/** या लिंकवर **सोमवार, दिनांक २०.०७.२०२६** रोजी जाहीर करण्यात येत आहे. सदर लिंक मंडळाच्या **www.msbae.ac.in** या संकेतस्थळावर Higher Art Exam या टॅबमध्ये उपलब्ध आहे.

| क्रमांक | अभ्यासक्रम |
|---|---|
| १ | Diploma in Art Education |
| २ | Art Master's Certificate |

०२. वरील अभ्यासक्रमाच्या निकालाची प्रत कला परिसंस्थेचे प्रमुख (कुलसचिव/अधिष्ठाता/ प्राचार्य) यांच्या लॉगिनवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर निकाल संबंधितांना कळविण्याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच, निकालाची प्रत कला परिसंस्थेकडे कायमस्वरुपी जतन करुन ठेवावी.

०३. ज्या विद्यार्थ्यांना वरील निकालाबाबत गुण पडताळणी करावयाची असेल, अशा विद्यार्थ्यांनी विहीत नमुन्यातील अर्ज व त्यासाठी लागणारे प्रती विषय रु.१००/- याप्रमाणे पडताळणी शुल्क आपल्या परिसंस्थेकडे जमा करावे. विहीत नमुन्यातील पडताळणी अर्ज उच्चकला परीक्षेच्या **https://hae.semesterpattern.msbae.in/** या लिंकवर Notifications या टॅबमध्ये उपलब्ध आहे.

०४. ज्या कला परिसंस्थांनी विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण संगणक प्रणालीमध्ये ऑनलाईन पध्दतीने भरले नाहीत अशा विद्यार्थ्यांना निकाल राखीव (Result held Reserve-RHR) ठेवण्यात आला आहे. निकाल राखीव ठेवण्यात आलेल्या कला परिसंस्थेचे कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांनी त्यांच्या कला परिसंस्थेतील संबंधित अध्यापकांना अशा विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुणासंदर्भातील मुळ कागदपत्रे व (अंतर्गत गुण भरलेले विहित नमुने) कला परिसंस्थेच्या पत्रासह दिनांक २२.०७.२०२६ ते २९.०७.२०२६ या कालावधीत मंडळाच्या कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत सुचित करावे, जेणेकरुन या प्रकरणी पुढील आवश्यक ती कार्यवाही करता येईल. विहित कालावधीनंतर प्रस्तुत प्रकरणी कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही, याची सक्त नोंद घ्यावी.

०५. संबंधित कुलसचिव/अधिष्ठाता/ प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणाऱ्या गुण पडताळणी अर्जानुसार उच्चकला परीक्षेच्या वरील लिंकवर आपल्या Institute लॉगिन वरुन अशा विद्यार्थ्यांचे गुण पडताळणी अर्ज विहित पडताळणी शुल्कासह दिनांक २२.०७.२०२६ ते २९.०७.२०२६ या कालावधीमध्ये केवळ ऑनलाईन पध्दतीने सादर करावेत. विहित कालावधीमध्ये प्राप्त होणाऱ्या अर्जावरच पुढील कार्यवाही करण्यात येईल. ऑफलाईन पध्दतीने पडताळणी अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

(विनोद दांडगे)
संचालक,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई.

प्रत,
१.निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२.निवड नस्ती.